नोंदणी क्र. १७/११३०५

# ऑल इंडिया भारतीय कामगार सेना महासंघ

श्री. सूर्यकांत महाडिक
अध्यक्ष
शिवसेना उपनेते व माजी आमदार

मुख्य कार्यालय: प्रफुल्लबन सोसायटी, आर. के. वैद्य रोड, दादर (प), मुंबई-४०००२८ दूरध्वनी: २४३१५००९ / २४२१६०८६

दिनांक ४.१२.२०१९

प्रति
मा.श्री. प्रदीप मयेकर
ओ. भुज. जी. सी. कर्मचारी संघटना

यांसी जय महाराष्ट्र!

विषयः **केन्द्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणांचा निषेध करण्यासाठी सर्वपक्षीय कामगार संघटनांनी दि.८ जानेवारी २०२० रोजी पुकारलेल्या एक दिवसीय लाक्षणिक संपामध्ये सामिल होण्याचे आवाहन**

महोदय,

केन्द्र सरकारच्या नियोजनशुन्य कारभारामुळे देशावर आलेल्या आर्थिक संकटात देशभरातील सर्वच कामगार, नोकरदार आणि उद्योग व्यवसायाला कठीण परिस्थितीचा सामना करावा लागत आहे. देशभरातील लाखो कामगार सध्या बेरोजगारीच्या विळख्यात अडकले आहेत.

केन्द्र सरकारच्या कामगारविरोधी धोरणांबरोबरच, उद्योगधंद्याना आवश्यक ते पाठबळ न मिळाल्यामुळे कामगारक्षेत्रात 'न भूतो न भविष्यती' असा संकटकाळ समोर उभा राहिला आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी व कामगार, व्यवसायिक यांचा बुलंद आवाज संसदेत पोहचवून सरकारचे डोके ताळ्यावर आणण्यासाठी सर्वपक्षीय कामगार संघटनांनी दि.८ जानेवारी २०२० रोजी एक दिवसीय लाक्षणिक संप पुकारला आहे.

शिवसेना पक्षप्रमुखांच्या आदेशानुसार शिवसेनाप्रणित सर्व कामगार संघटनांनी प्रत्यक्ष सहभाग घेवून हा संप यशस्वी करावा यासाठी आपल्याला नम्र आवाहन करीत आहे.

धन्यवाद,

आपला विश्वासू,

सूर्यकांत महाडिक
अध्यक्ष
शिवसेना उपनेते व मा.आमदार

सोबत
मा.खासदार श्री.अनिल देसाई
शिवसेना सचिव यांचे दि.२५.११.२०१९ रोजीचे पत्र

# शिवसेना मध्यवर्ती कार्यालय

**शिवसेना भवन :** पहिला मजला, राम गणेश गडकरी चौक, दादर, मुंबई – ४०० ०२८.
दूरध्वनी : २४३७ ११९९, २४५४ ४११४ फॅक्स : २४२१ १७ १७
**शिवालय :** ७, शासकीय बॅरॅक, नरीमन पॉईंट, मुंबई – ४०० ०२१.
दूरध्वनी : २२८८ ३४३४, २२८८ ५०५० फॅक्स : २२८८ ३५३५


२५ नोव्हेंबर २०१९

प्रति,
**श्री.सुर्यकांत महाडीक**
अध्यक्ष, भारतीय कामगार सेना महासंघ
मुंबई

यांसी जय महाराष्ट्र !

महोदय,

देशावर ओढवलेल्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे महागाईत वाढ, वाढती बेरोजगारी, कंपन्यांना टाळे लागण्याची परिस्थिती त्यामुळे होणारी कामगार कपात, उद्योगपती ते व्यापारी ते नोकरदार सर्वच वर्गातील समाज घटकांच्या नाकीनऊ आल्याचे चित्र आज देशभरात दिसत आहे. या गंभीर विषयास राजकारणाचा बाज देण्याचा केविलवाणा प्रयत्न केंद्र सरकारातील मंत्री करीत आहेत व आर्थिक मंदीसदृश परिस्थिती म्हणून वेळकाढूपणा करीत आहेत. अनावश्यक असलेली नोटाबंदी, घिसाडघाईने आणलेला जीएसटी याचे हे दुष्परिणाम संपूर्ण देशाला ग्रासत आहेत.

यावर आपण हिंदुस्थानातील जबाबदार कामगार संघटनांचे नेतृत्व करणारे प्रतिनिधी बुधवार दि.८ जानेवारी २०२० रोजी एकत्र येऊन कामगार. कष्टकरी, शेतकरी, नोकरदार, छोटे-मोटे व्यापारी यांचा बुलंद आवाज दिल्लीच्या तख्तापर्यंत पोहोचवून त्यावर तातडीने उपाययोजना करण्यास केंद्र सरकारला भाग पाडण्यासाठी एक दिवसाचा लाक्षणिक संप पुकारला आहे. त्यास शिवसेना पक्षातर्फे **शिवसेनापक्षप्रमुख म्हणून श्री.उद्धवजी ठाकरे** यांनी पाठिंबा दर्शविला आहे.

**शिवसेनापक्षप्रमुख मा. श्री.उद्धवजी ठाकरे** यांच्या आदेशानुसार फक्त संपासाठी संप न करता कृतीशील ठोस पावले सरकारने उचलावीत व हा आर्थिक मंदीमध्ये रुतलेला भारतीय अर्थव्यवस्थेचा गाडा पुन्हा जलदगतीने कार्यरत व्हावा यासाठीचे अभ्यासपूर्ण निवेदन केंद्र सरकारकडे पाठवून त्याच्या पाठपुराव्यासंबधित आपली जबाबदारी पार पाडावी ही विनंती.

धन्यवाद!

आपला नम्र,

**खा.अनिल देसाई**
**सचिव-शिवसेना**

Email : shivsenabhavan@gmail.com • Website : www.shivsena.org